MMRC

**परदेशातील भारतीय राजदूत आणि उच्च्यायुक्त यांनी आझाद मैदान येथे केली मेट्रो मार्ग-३ ची पाहणी**

*पाहुण्यांनी मुं. मे. रे. कॉ. च्या टीमचे केले कौतुक*

**मुंबई, जून २८, २०१८ -** आज सकाळी विविध देशांचे भारतीय राजदूत आणि उच्च्यायुक्त यांची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आझाद मैदान येथे पाहणी भेट आयोजित केली होती. परदेशात कार्यरत असलेल्या भारतीय उच्चाधिकाऱ्यांच्या महाराष्ट्र राज्य दौऱ्याचा मेट्रो प्रकल्प पाहणी एक भाग होता. त्यांना मुंबई मेट्रो-३ या प्रकल्पाविषयीची सखोल माहिती करून देणं हा या भेटीमागचा उद्देश होता. या दौऱ्यादरम्यान उच्च्याधिकाऱ्यांनी या महा - उपक्रमांतर्गत वापरण्यात आलेल्या आंतर्राष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान, अंमलबजावणीतील आव्हाने आणि प्रकल्पाची सर्वांगीण उपयुक्तता यांची माहिती घेतली. या दौऱ्यात मुं. मे. रे. कॉ. च्या व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे यांनी मुंबई मेट्रो मार्ग-३ या प्रकल्पाची सविस्तर माहिती आणि सादरीकरण उच्च्याधिकाऱ्यांना दिलं. ते पाहून पाहुण्यांनी मुं. मे. रे. कॉ. च्या टीमचं कौतुक केलं.

यावेळी सौदी अरेबियातील भारतीय राजदूत श्री अहमद जावेद, कोलंबियातील भारतीय राजदूत श्री रवी बांगर, बेलारुसमधील भारतीय राजदूत श्रीमती संगीता बहादूर, डेन्मार्क मधील भारतीय राजदूत श्री अजित विनायक गुप्ते, ट्यूनेशियातील भारतीय राजदूत श्री प्रशांत पिसे , कोरियातील भारतीय राजदूत श्री अतुल एम गोतसूर्वे , तुर्कमिनिस्थानातील भारतीय राजदूत श्री अझर ए एच खान , ऑस्ट्रेलियातील भारतीय राजदूत श्री डॉ. अजय एम गोंदाणे, फिजी चे भारतीय उच्च्यायुक्त श्री विश्वास विदू सपकाळ हे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुं. मे. रे. कॉ. तर्फे व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे, संचालक (प्रकल्प) श्री एस. के. गुप्ता, कार्यकारी संचालक (नियोजन) श्री आर. रमणा आणि कॉर्पोरेशनचे वरिष्ठ अधिकारी हजर होते.

"राजदूत आणि उच्च्यायुक्त यांचा हा पाहणी दौरा मेट्रो-३ टीमसाठी प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र शासनाने या उपक्रमात मुंबई मेट्रो मार्ग-३ चा समावेश केला ही अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे. यासाठी आम्ही शासनाचे आभारी आहोत." असे श्रीमती अश्विनी भिडे या पाहणी दौऱ्यानंतर बोलताना म्हणल्या.

**For media queries, please contact**

**Vaidehi More**
+91 9028 543087
Vaidehi.more@mmrcl.com

**Sukriti Kumar**
+91 9833 252547
Sukriti.kumar@bm.com